# निफाड पंचायत समिती, निफाड, जिल्हा नाशिक या संस्थेचा सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल.

---

जा.क्र.स्था-३/ब/पंस/लेपअ/नाशिक/

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक
लेखा कोष भवन, तिसरा मजला,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
नाशिक
दिनांकः-

प्रेषक,
उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा,नाशिक.

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक.

निफाड पंचायत समिती, निफाड, जिल्हा नाशिक या संस्थेचे सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण श्री. सं. वा. पारनेरकर, सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी यांनी दिनांक २९.७.२००८ ते २२.८.२००८ या कालावधीत पूर्ण केले व पुनर्विलोकन श्री. सु. ध. ठाकरे, प्रभारी जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक १२.९.२००८ रोजी केले. लेखापरीक्षण अहवालावर चर्चा करुन अंतिमीकरण श्री. वि. ए. कोते, उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक ८.१०.२००८ रोजी केले.

लेखापरीक्षीत आर्थिक वर्षात खालीलप्रमाणे पदाधिकारी व अधिकारी या संस्थेचे कामकाज पहात होते.

**सभापती-**

| | |
|---|---|
| श्रीमती. वैशाली भास्करराव बनकर | १.०४.२००७ ते ३१.३.२००८ |

**गटविकास अधिकारी-**

| | |
|---|---|
| श्री. एकनाथ केशवराव शेगावकर | ०१.०४.२००७ ते २४.०४.२००७ |
| श्री. सी. ए. मिश्रीकोटकर (प्रभारी) | २५.०४.२००७ ते ०२.०६.२००७ |
| श्री. एस. जी. माळोदे | ०३.०६.२००७ ते ३१.०३.२००८ |

## भाग पहिला
## मागील लेखापरीक्षण

मागील लेखापरीक्षण अहवालातील खालील नमुद परिच्छेद थकीत असून त्याबाबत मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे स्वतंत्ररित्या पत्रव्यवहार सुरु आहे.

| अ. क्र. | वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकूण परि. |
|---|---|---|---|
| १ | १९८५-८६ | ३<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.३-अंतर्गत दुरध्वनी अनियमित खर्च (८६.६) | १ |
| २ | १९९६-९७ | १९(२),२२(१) | २ |
| ३ | १९९७-९८ | ७,२५(ब,क) | २ |
| ४ | १९९९-२००० | ६,२३,२४,३१<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.६:- हातपंप विद्युतपंप वर्गणी बाबत (४.१०४(७९)<br>परि.क्र.३१:- अपूर्ण स्थितीतले बांधकामे .(४.१०२(२३) | ४ |
| ५ | २०००-०१ | ३,५,८,१४,२०<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.३ - मागासवर्गीयावर कमी खर्च (४.१८७)<br>परि.क्र.५ - पंचायत समिती सेस अनुदानातून प्रेशर कुकर वाटप करणे बाबत (४.१४२)<br>परि.क्र.२०- अपूर्ण बांधकामाबाबत (४.१८२)<br>आंबेडकर नगर येथे गटार बांधणे (४.१४२) | ५ |
| ६ | २००१-०२ | ३,७,१२,१७<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.३ - वाहन क्रमांक एमएच - १५ अे अे-४०२२ वरील खर्चाबाबत ४.२५२(७) | ४ |
| ७ | २००२-०३ | ४,५,७,१०,१२(अ),१३,१८,२९<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र. ४ :- १००% अनुदानावर मागासवर्गीयांना बैलगाडीचे वाटपाबाबत (४.१३३)<br>परि.क्र.७ :- पंचायत समिती शेतकरी निवासस्थानाचे दर रेकॉर्डरुम तयार करणे. (४.४०)<br>परि.क्र.२९ :- लघुपाटबंधारे उपविभाग निफाड अपूर्ण जवाहर विहीरींबाबत (४.२०१(१७) | ८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | २००३-०४ | ३,६,१६,१७,१८,१९,२०<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.१६ :- अपूर्ण जवाहर विहीरींबाबत लघुपाटबंधारे विभाग निफाड (४.१९८(१२) | ७ |
| ९ | २००४-०५ | ३,४,५,६,७,८,१५,१७,२०,२१,२५,२८,२९,३३<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.४ :- समाजकल्याण योजनेअंतर्गत १००% अनुदानावर मागासवर्गीय लाभार्थ्यांना ताडपत्री वाटप योजना (४.११३)<br>परि.क्र.६:- ५०% अनुदानावर ३ पिस्टन पंप वाटप योजना(४.१९१)<br>परि.क्र.२१ :- रोखवहीतील शिल्लक व बँक पासबुकाप्रमाणे शिल्लक तफावतीचा मेळ न घेणेबाबत (४.३३०(१)<br>परि.क्र. २९ :- अपूर्ण बांधकामाबाबत. (४.३३२(२५) | १४ |
| १० | २००५-०६ | ३,४,५,६,७,८,१२,१३,१४,१५,१६,१७,१९,२१,२२,२३,२४,२५,२६,२७,२८,२९<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालांत समाविष्ठ<br>परि.क्र.४ :- पंचायत समिती उपकरातून १००% अनुदानावर मागासवर्गीय लाभार्थ्यांसाठी खरेदी केलेल्या शौचालय भांडे योजनेबाबत (४.४०५)<br>परि.क्र.५ :- पंचायत समिती उपकरातून ५०% अनुदानावर शेतक-यांना प्लॅस्टीक घमेले पुरवठा योजनेबाबत (४.२३४)<br>परि.क्र.८ :- पंचायत समिती उपकरातून ९० % अनुदानावर वाटप केलेल्या शेवया मशिनबाबत. (४.६११)<br>परि.क्र.१५ :- पंचायत समिती स्तरावरील लेखे व त्यांच्या रोकडवह्या यांचे ताळमेळाबाबत. (४.७२६(९)<br>परि.क्र.१६ :- मुदतबाह्य धनादेश रद्द न केलेबाबत (४.७३३(४)<br>परि.क्र.१७ :- गटविकास अधिकारी, निफाड यांचे स्तरावर असंवितरीत असलेल्या ग्रामपंचायत अनुदानाबाबत (४.७३२(३)<br>परि.क्र.२५ :- अपूर्ण बांधकामाबाबत. (४.७२८(३०) | २२ |
| ११ | **सन २००६ – २००७** | | |
| परिच्छेद क्रमांक ३ :- अंदाजपत्रकाबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक ४ :- पंचायत समिती सेस अनुदानातून प्राथमिक आरोग्य केंद्र चांदोरीसाठी फर्निचर खरेदीबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक ५ :- पंचायत समिती सेस अनुदानातून प्राथमिक आरोग्य केंद्र, चांदोरीसाठी ८०० वॅट इन्व्हर्टर कम युपीएस वुईथ बॅटरी खरेदी. | | | |
| परिच्छेद क्रमांक ६ :- पंचायत समिती सेस मधून खरेदी केलेल्या वाहनाचा मर्यादेपेक्षा जास्त वापर केल्याबाबत. | | | |
| परिच्छेद क्रमांक ७ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर केलेबाबत. | | | |

| |
|---|
| परिच्छेद क्रमांक ८ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर केलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ९ :- वाहन वापरातील गैरव्यवहाराबाबत......... |
| परिच्छेद क्रमांक ११ :- पंचायत समिती उपकरातून ९०% अनुदानावर वाटप केलेल्या शेवया मशीनबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक १२ :- पंचायत समिती उपकर रोकडवहीचा ताळमेळ न घेणेबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक १३ :- पंचायत समिती स्तरावरील लेखे व त्यांच्या रोकडवह्या यांचे ताळमेळाबाबत. (पंचायत समिती, निफाड)(पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक १४ :- बाहयरुग्ण फी उशिरा भरणा केलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १७ :- पंचायत समिती, निफाड यांचे स्तरावर असंवितरीत असलेल्या ग्रामपंचायत अनुदानाबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक १८ :- थकीत अग्रीम रक्कमा वसुलीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १९ :- अनामत नोंदवही अपूर्ण असलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २० :- लघुपाटबंधारे उपविभागाकडील अपूर्ण मालमत्ता नोंदवह्यांबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २१ :- बांधकाम उपविभागाकडील अपूर्ण मालमत्ता नोंदवहयाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २२ :- निवृत्ती वेतन आदेश नोंदवहीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २३ :- पंचायत समिती निफाड - समाजकल्याण उपविभाग नमुना नं. ३३ मालसाठा नोंदवहीमधील बिनावापर पडून असलेल्या साहित्य नोंदीबाबत |
| परिच्छेद क्रमांक २४ :- ग्रामपंचायत स्तरांवरील अफरातफर प्रकरणे व पंचायत समिती स्तरावरील प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांमध्ये अंतर्भूत रक्कमांबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २६ :- नादुरुस्त / विनावापर शाळा खोल्यांबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २७ :- ग्रामपंचायतींना अनुदान वाटपाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २९ :- सभा इतिवृत्त नोंदवहीवर मा. सभापती व गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्ष-या नसणेबाबत....... |
| परिच्छेद क्रमांक ३० :- अखर्चित अनुदान शासनास परत न केलेबाबत...... (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक ३१ :- अपूर्ण गावतळे व सिमेंट प्लग बंधाराबाबत. (लघुपाटबंधारे) (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक ३२ :- अपूर्ण विहिरी बांधकामाबाबत. (कृषि उपविभाग) (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक ३३ :- जवाहर विहिरींची अपूर्ण बांधकामे व अखर्चित अनुदानाबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक ३४ :- जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले न घेतलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ३७ :- वार्षिक लेखे. |

टिप :- उपरोक्त नमुद केलेल्या आक्षेपांच्या संदर्भात त्या-त्या वर्षाचे पुढील अभिप्रायामध्ये नमुद करण्यांत आलेले परिच्छेद क्रमांक अंतिम समजण्यांत यावेत.

## भाग दुसरा
## (चालु लेखापरीक्षण)

---

**परिच्छेद क्रमांक ३ :- अंदाजपत्रकाबाबत.**

पंचायत समिती, निफाडचे सन २००७ – २००८ चे मुळ अंदाजपत्रक पंचायत समिती ठराव क्रमांक २६९ दिनांक ९.२.२००७ व सुधारीत अंदाजपत्रक ठराव क्रमांक ५२ दिनांक २३.१.२००८ अन्वये मंजूर केले आहे. प्रत्येक शिर्षाखालील जमा खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(आकडे रुपयात)

| अ.क्र. | शिर्षक | तरतुद | प्रत्यक्ष खर्च | कमी खर्च | जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३ शिक्षण | ७१,००० | ६९,९९२ | १,००८ | -- |
| २ | ४ बांधकाम इवद | २,३२,०३३ | २,०४,६८० | २७,३५३ | -- |
| ३ | ५ लघुपाटबंधारे | -- | -- | -- | -- |
| ४ | ८ प्रा.आरोग्य | १,५०,००० | -- | १,५०,००० | -- |
| ५ | ११ शेती | ४,५०,२२८ | ४,५२,९५५ | -- | २,७२७ |
| ६ | १२ पशुसंवर्धन | ५०,००० | ४९,९७२ | २८ | -- |
| ७ | १४ समाज कल्याण | ५,२६,५०० | ५,२६,१७५ | ३२५ | -- |
| ८ | २० संकिर्ण महिला व बालकल्याण | १,७५,५०० | १,७५,५०० | -- | -- |
| ९ | २० संकिर्ण मबाक (इंधन व डिझेल) | ४५,००० | ४९,०५८ | -- | ४,०५८ |
| | **एकूण** | **१७,००,२६१** | **१५,२८,३३२** | **१,७८,७१४** | **६,७८५** |

सुरुवातीची शिल्लक रुपये १२,७७,०३३ + प्राप्त अनुदान रुपये ४,३४,७८७/- असे एकुण उपलब्ध अनुदान रुपये १७,११,८२०/- इतके होते.
यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) सन २००७ – २००८ चे अंदाजपत्रक वाजवी व नियोजनपुर्वक व वस्तुस्थितीस धरुन केले नसल्याचे दिसून आले आहे. कारण मागील वर्षाचे शिल्लक अनुदान व चालू वर्षी आलेले अनुदान मिळून रक्कम रुपये १७,११,८२०/- जमा असतांना खर्च रक्कम रुपये १५,२८,३३२/- करण्यात आलेला आहे. तो तरतुदीपेक्षा रक्कम रुपये १,७१,९२९/- व प्राप्त अनुदानापेक्षा रक्कम रुपये १,८३,४८८/- ने कमी आहे. याचाच अर्थ अंदाजपत्रक नियोजनपूर्वक व वस्तुस्थितीस धरुन केलेले नाही.

२) मा. जिल्हाधिकारी, नाशिक व तहसिलदार, निफाड यांच्या कार्यालयांशी संपर्क साधून या पंचायत समितीचा दिनांक ३१.३.२००८ अखेर किती उपकर वसूल झाला, यातील किती

प्राप्त व्हावयाचा आहे, याबाबत ताळमेळ घेऊन उपकराच्या सर्व रक्कमा प्राप्त झाल्याचे प्रमाणीत करावे.

३) उपरोक्त तपशिलांत नमुद केल्याप्रमाणे विविध लेखाशिर्षाखाली खर्चासाठी केलेल्या तरतुदीपेक्षा रक्कम रुपये १,७१,९२९/- एवढया रक्कमेची बचत झाल्याचे दिसून येते. पुरेसा निधी उपलब्ध असतांना सुध्दा बचत झाली आहे. महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक पंरास/१०९३/प्र.क्र.१४४३/२७ दिनांक २०.९.१९९३ नुसार उपलब्ध निधीचा पुरेपुर विनियोग ग्रामीण जनतेला होईल, याबाबत अंदाजपत्रक तयार करतांना काळजी घ्यावी, अशा सूचना आहेत. ज्या योजनेसाठी खर्च करणे आवश्यक होते व खर्च होणे संभवनीय होते, अशा योजनांसाठी तरतूद केली असती तर बचत झाली नसती, अथवा नियोजनपूर्वक कामे केली असती तर बचत झाली नसती. बचतीचे सार्थ स्पष्टीकरण करुन पंचायत समिती सभेचे क्षमापन घेऊन पूर्तता दर्शवावी.

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (अ) खालील आक्षेप

---

### परिच्छेद क्रमांक ४ :- १००% अनुदानावर मागासवर्गीय लाभार्थ्यांना ताडपत्री वाटप करणेतील अनियमितता.

| | |
|---|---|
| योजनेचे उद्दिष्ट | मागासवर्गीयांना वैयक्तिक विकासासाठी शेती उपयोगी ताडपत्री पुरविणे |
| योजनेचे नाव | पंचायत समिती अनुदान सन २००७ – २००८ मधून मागास वर्गीयांसाठी करावयाच्या समाजकल्याण शिर्षकाखालील योजना |
| तांत्रिक मान्यता | गटविकास अधिकारी, पंचायत समिती निफाड क्रमांक सांख्यिकी/१४८/०८ दिनांक १.२.२००८ रु.८७,१६८/- व<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिप, नाशिक जा.क्र.संकना/सक्र ४/९४१/०७ दिनांक २२.१०.२००७ रुपये ४,४१,०००/- |
| योजनेचे कार्यक्षेत्र | निफाड तालुका |
| प्रशासकीय तरतूद | सर्वसाधारण सभा ठराव नंबर १९ अन्वये दिनांक ३०.७.२००७ अन्वये रुपये ५,२६,५००/- |
| पुरवठादार | भारतीय राष्ट्रीय उपभोक्ता सहकारी संस्था मर्यादित, मुंबई शाखा नाशिक यांचे वतीने युनायटेड सेल्स कंपनी प्रा. लिमिटेड, पुणे |
| खर्च | प्रमाणक क्रमांक १ दिनांक ५.११.२००७ नुसार रुपये ४,३९,००८ व प्रमाणक क्रमांक ९ दिनांक २९.३.२००८ रुपये ८७,१६८/- |

यासंदर्भात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेतः

१)	शासन परिपत्रक ग्रामविकास विभाग क्रमांक १०८९/प्र.क्र./५५/३४ दिनांक ५ ऑक्टोंबर १९८९ नुसार योजनेतील मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु तशी नोंदवही न ठेवल्याने लाभ धारकास समाज कल्याण विभाग, कृषि विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून देखील सदर योजना राबविल्या जातात. त्यामुळे लाभार्थ्यास दुबार लाभ दिला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मास्टर नोंदवही ठेवून व योग्य लाभार्थ्यांचीच निवड झाल्याची खात्री लेखापरीक्षणास पटवावी.

२)	ग्रामविकास विभागाकडील दिनांक २९ जुलै १९९३ च्या परिपत्रकातील सूचनानूसार गटविकास अधिकारी यांनी योजनेसंबंधी उपयोगिता प्रमाणपत्र निर्गमित न केल्याने योजनेच्या यशस्वीते बद्दल खात्री पटवावी.

३)	लेखा संहिता नियम १४४ मधील तरतूदीनुसार पुरवठादाराकडून ५% सुरक्षा अनामत देयकातून कपात करणे आवश्यक होते. तथापि रुपये ५,२६,१७६/- या रक्कमेवर ५% प्रमाणे रुपये २६,३०८/- एवढी सुरक्षा ठेव कपात केली नाही. सुरक्षा ठेव कपात न करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घ्यावे.

४)	शासन निर्णय क्रमांक १०९३/प्र.क्र.१२३८/३४ दिनांक १ सप्टेंबर १९९३ मधील तरतूदीनुसार लाभार्थ्यांच्या अंतिम निवड यादीस पंचायत समितीचे सभेची मान्यता घेण्यात आलेली नाही. याबाबत सभेचे क्षमापन व कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी.

५)	महाराष्ट्र जिल्हा परिषद तांत्रिक मंजूरी नियम १९६४ चे नियम क्रमांक ३(२) नुसार सदरील योजनेस कृषी संचालक, नाशिक विभाग यांची मंजूरी घेणे आवश्यक असल्याने संबंधितांची तांत्रिक मंजूरी न घेताच योजना राबवून संबंधितांनी अनियमितता केलेली आहे. त्यांचे क्षमापनासह कार्योत्तर मंजूरी घेऊन अनुपालन दर्शवावे.

६)	शासन निर्णय ग्राम विकास विभाग व जलसंधारण विभाग क्रमांक/मागास/१०९३/ प्र.क्र.१२३९/३४ दिनांक १ सप्टेंबर १९९३ नुसार साहित्य खरेदी व वाटप त्याच वित्तीय वर्षात वाटप करणे बंधनकारक आहे. परंतु सदरचे साहित्य सन २००७ – २००८ मध्ये खरेदी करुन त्याच वित्तीय वर्षात वाटप केलेले नाही. एकूण १६३ नग ताडपत्री नगांची खरेदी केलेली आहे. परंतु लेखापरिक्षण पूर्ण होईपावेतो (२४.८.२००८) ४५ नग साठा नोंदवहीत शिल्लक आहेत. म्हणजेच केवळ वाढीव उपकर खर्च करण्याचा मानस डोळयासमोर ठेवून खरेदी केल्याचे दिसून येते. यावरुन शासन निर्णय, क्रमांक जलसंधारण झेडपीए/२०००/४११३३ दिनांक १५ जानेवारी २००१ मधील तरतूदींप्रमाणे गटविकास अधिकारी, पंचायत समिती, निफाड यांनी योजना राबविण्याचे वेळापत्रक तयार केले नसल्याने योजना १००% यशस्वी झालेली नाही, हे स्पष्ट होते. यास पंचायत समिती सभेचे क्षमापन घेण्यात यावे.

उपरोक्त अभिप्रायांचे पुर्तते अभावी रक्कम रुपये ५,२६,१७६/- लेखापरीक्षणास आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
आक्षेपाधिन रक्कम रुपये ५,२६,१७६/-
पंचायत समिती सेस

**परिच्छेद क्रमांक ५ :- ५०% अनुदानावर तालुक्यातील शेतक-यांना ताडपत्री पुरविणे**

| | |
|---|---|
| योजनेचे उद्दिष्ट | गरजू शेतक-यांना वैयक्तिक विकासासाठी ५०% अनुदानावर ताडपत्री पुरविणे |
| योजनेचे नाव | पंचायत समिती सेस अनुदान सन २००७ – २००८ मधून शेतक-यांच्या कल्याणार्थ ११ कृषी या लेखाशिर्षाखालील योजना |
| तांत्रिक मान्यता | गटविकास अधिकारी, पंचायत समिती निफाड दिनांक १.३.२००८ |
| प्रशासकीय तरतुद | सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ५९ दि.२२.२.२००८ तरतुद रु.२,०४,२६८/- |
| पुरवठादार | युनायटेड सेल्स कंपनी प्रा.लि. पुणे |
| खर्च तपशील | प्रमाणक क्रमांक ८ दि. २९.३.२००८ अन्वये रक्कम रुपये २,०३,३९५/- |

यासंदर्भात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत:

१) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग/भारवंस/१०८८/(२५१२) उद्योग ६ दिनांक २ जानेवारी १९९२ नुसार वार्षिक खरेदी रुपये ५०,०००/- किंवा त्यापेक्षा अधिक असेल अशा वेळी राजपत्रात निविदा प्रसिध्दी करुन निविदा मागविणे बंधनकारक आहे. सदरची ताडपत्री खरेदी ही रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त असल्याने याबाबत संबंधितांनी जाहिरात न देता खाजगी कंपनी कडून खरेदी केल्याने पंचायत समितीस स्पर्धात्मक दराचा लाभ मिळालेला नाही. सदर बाबतीत पंचायत समिती निफाडचे गटविकास अधिकारी यांनी शासनाचे नियमांचे उल्लघंन करुन केलेली कार्यवाहीची खरेदी ही गंभीर अनियमितता दर्शविते याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन अनुपालन दर्शवावे.

२) लेखा संहिता नियम १४४ मधील तरतुदीनुसार पुरवठादाराकडून ५% सुरक्षा ठेव देयकातून कपात केलेली नाही. सुरक्षा ठेव वरील नियमांप्रमाणे कपात न करणेबाबतच्या अनियमिततेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घ्यावे.

३) शासन निर्णय, क्रमांक १०९३/प्र.क्र.१२३८/३४ दिनांक १ सप्टेंबर १९९३ मधील तरतुदीनुसार लाभार्थ्यांची अंतिम यादीस पंचायत समितीचे सभेत मंजूरी घेण्यात आलेली नाही. यास सभेचे क्षमापन व कार्योत्तर मान्यता घ्यावी.

४) शासन निर्णय ग्रामविकास विभाग यांचे दिनांक १ सप्टेंबर १९९३ नुसार साहित्य खरेदी व वाटप त्याच वर्षात करण्यात आलेली नाही.

ताडपत्री वाटप त्याच वर्षात झाले नाही हे लाभार्थी हिस्सा संबंधित कंपनीस पाठविलेल्या तारखांवरुन दिसून येते.

| डी.डी.नंबर | रक्कम रुपये | भरणा दिनांक |
|---|---|---|
| २९९००२ | १,८५,६३९ | ३०.६.२००८ |
| ६४०८६४ | १७,७५७ | १४.८.२००८ |
| **एकूण** | **२,०३,३९६** | |

पंचायत समितीने वाढीव उपकरातून राबविण्यात आलेल्या योजना शासनाचे उपरोक्त नियमाप्रमाणे राबविलेल्या नाहीत. त्यामुळे उपरोक्त अभिप्रायांची पुर्तता होईपावेतो ५०% अनुदान खर्च रुपये २,०३,३९६/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

लेखाशिर्ष
वाढीव उपकर
पंचायत समिती सेस
आक्षेपाधिन रक्कम रुपये २,०३,३९६/-

---

**परिच्छेद क्रमांक ६ :- घसरगुंडी खरेदीबाबत.**

पंचायत समिती निफाडचे महिला व बालकल्याण विभागासाठी सन २००७ – २००८ च्या मुळ आंजपत्रकात ठराव क्रमांक १० दि. १.४.२००७ नुसार रु.१,३३,०००/- व सुधारीत अंदाजपत्रकामध्ये ठराव क्रमांक ५६ दि.२६.१.२००८ नुसार रुपये १,७५,५००/- एवढी तरतुद करण्यात आलेली आहे. उपरोक्त तरतूदीच्या अनुषंगाने अंगणवाड्यांतील लहान मुलांना खेळण्यासाठी महाराष्ट्र लघु उद्योग महामंडळ, नाशिक यांचेकडून घसरगुंडी खरेदी करुन त्यासाठी खालील तपशिलानुसार खर्च नोंदविण्यात आलेला आहे.

| प्र.क्र. | दिनांक | नग | दर | किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| ७ | १५.१.२००८ | २१ | ५६२५ | १,२२,८५० |
| ५ | २६.३.२००८ | ०९ | ५६२५ | ५२,६५० |
| | | ३० | **एकूण** | **१,७५,५००** |

उपरोक्त खर्चाचे बाबतीत खालील अभिप्राय देण्यांत येत आहेत:

१) लेखा संहिता नियम ८३(३) प्रमाणे साहित्याबाबत योग्यता प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही.

२) ज्या अंगणवाड्यांना घसरगुंडी पुरविण्यात आली त्या अंगणवाडीच्या परीसरात घसरगुंडी बसविण्यासाठी योग्य जागा असल्याबाबत मा. प्रकल्प अधिकारी यांचा दाखला नस्तीसोबत नाही. तसेच घसरगुंडी ज्या अंगणवाड्यांना देण्यांत आलेल्या आहेत अशा अंगणवाड्यांची घसरगुंडी व्यवस्थित बसवून व ती कार्यान्वित झाल्याचे उपयोगिता अहवाल दिलेले नाहीत.

३) संबंधित अंगणवाड्यांनी त्यांचे जंगम मालमत्ता नोंदवहीत जमा नोंद केल्याबाबतच्या पोहोच लेखापरीक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत.

४) लेखासंहिता नियम ८३(३) नुसार व शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्रमांक भारवस/१०८८/२५१२/उद्योग-६, दिनांक २ जानेवारी १९९२ मधील परिच्छेद क्रमांक ८ : ४ (परिशिष्ट ६) नुसार घसरगुंडी बसविण्यात आलेल्या टिनपत्र्याची योग्य चाचणी सक्षम अधिकारी व संस्थेकडून करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

उपरोक्त अभिप्रायांचे पुर्ततेअभावी खर्च रुपये १,७५,५००/- आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
वाढीव उपकर
आक्षेपाधिन रक्कम रुपये १,७५,५००/-

---

**परिच्छेद क्रमांक ७ :- पंचायत समिती निफाड स्तरावरील लेखे व त्यांच्या रोकडवह्या यांचे ताळमेळाबाबत.**

**वगळला**

---

**परिच्छेद क्रमांक ८ :- निवृत्ती वेतन नोंदवहीतील अनियमितता.**

पंचायत समिती निफाड अंतर्गत सामान्य प्रशासन विभागाकडील निवृत्ती वेतन प्रदान प्रकरणांची पडताळणी करता त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नमुद करण्यात येत आहेत:

१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे परिशिष्ट ४ – ६९ नुसार नमुना क्रमांक एपीपी – ९ ह्या नमुन्यात पेन्शन प्रदानाची नोंद ठेवणे आवश्यक आहे. पंचायत समिती निफाड अंतर्गत सामान्य प्रशासन विभागाने विहीत नमुन्यातील एकूण ३ नोंदवह्यांमध्ये एकूण १३४ निवृत्ती / कुटूंब निवृत्ती वेतन धारकांचा तपशिल नोंदविण्यात आलेला आहे.

तथापि सदर नोंदवह्यांची पडताळणी करता खालीलप्रमाणे उणिवा आढळून आल्या.

अ) सदर नोंदवहीतील डावीकडील पृष्ठांवर आवश्यक तो सर्व तपशील परिपूर्णरित्या नमुद केलेला नाही. उदा. निवृत्तीचा दिनांक, अशंराशीकरणाचा दर व प्रदानाचा दिनांक, निवृत्ती वेतनाचा दर, कुटूंब निवृत्ती वेतनाचा दर, कुटूंब निवृत्ती वेतनात ज्या दिनांकापासून बदल करावयाचा आहे तो दिनांक व त्याचा दर इत्यादी तपशील परिपूर्णरित्या नमुद न केल्या कारणाने निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतन योग्य दराने प्रदान होत असल्याची खात्री लेखापरीक्षणात करता आली नाही.

ब) काही निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतन धारकांच्या माहे फेब्रुवारीच्या निवृत्ती वेतनातून अतिप्रदान रक्कमेचा हप्ता कपात करण्यात आलेला आहे. परंतु एपीपी – ९ नोंदवहीत किती अतिप्रदान झाले आहे, त्याची वसूली किती हप्त्यात व कोणत्या दराने करावयाची आहे. इत्यादी आवश्यक तपशिलाची ठळकपणे नोंद घेतलेली नाही. त्यामुळे करण्यात येत असलेली वसूली योग्य आहे किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणात खात्री करता आली नाही.

२) लेखासंहिता परिशिष्ट ४ च्या ७७ नुसार दरवर्षी निवृत्ती / कुटूंब निवृत्ती वेतन धारकांकडून हयातीचे दाखले प्राप्त करुन घेऊनच नंतरचे निवृत्तीवेतन प्रदान करणे आवश्यक असतांना अशा प्रकारची कार्यवाही करण्यात येत नाही. त्यामुळे सर्व हयात निवृत्ती वेतन धारकांनाच प्रदान झाल्याची खात्री लेखापरीक्षणात करता आलेली नाही.

३) लेखासंहिता परिशिष्ट ४ च्या नियम ८० नुसार ज्यांची निवृत्ती वेतने त्यांच्या विवाहानंतर किंवा पुनर्विवाहानंतर बंद होण्याजोगी असतील अशा स्त्री निवृत्ती वेतन धारकांच्या बाबतीत नमुना एपीपी १४ मधील प्रमाणपत्र दर ६ महिन्यांनी (डिसेंबर व जून) घेणे आवश्यक असतांना अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही पंचायत समिती निफाड यांचेकडून करण्यात आलेली नाही. त्यामुळे निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाचे प्रदान योग्य दराने व योग्य व्यक्तिलाच होत असल्याबाबत लेखापरीक्षणात खात्री करता आलेली नाही.

४) एपीपी – ९ नोंदवहीत व निवृत्ती वेतन प्रदान आदेश पुस्तिकेवर कोणताही प्रति संदर्भ नमुद केलेला नसल्याने, नोंदवहीतील नोंदींची तपासणी करण्यासाठी प्रदान आदेश शोधणे ह्यासाठी लेखापरीक्षण काळात अनेक अडचणी आल्या असून वेळेचा अपव्यय झाला आहे. तरी सर्व बिले प्रदान आदेशांवर एपीपी – ९ नोंदवहीतील पृष्ठ क्रमांकाचा संदर्भ व एपीपी नोंदवहीत निवृत्ती वेतन प्रदान आदेशाचा संदर्भ क्रमांक ठळक अक्षरात नमुद करावा व पुर्तता लेखापरिक्षणात दर्शवावी.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे परिशिष्ट ४ नियम ९१ नुसार निवृत्ती वेतनाच्या चुकीच्या प्रदानास संवितरण अधिकारी व्यक्तीशः जबाबदार असल्याने उपरोक्त नमुद उणिवांची पुर्तता करुन होणारे निवृत्ती वेतन, कुटूंब निवृत्ती वेतन प्रदान योग्य दराने होत असल्याची खात्री करुन व तसे प्रमाणित करुन अनुपालन लेखापरिक्षणास दर्शवावे.

१९ सामान्य प्रशासन

---

**परिच्छेद क्रमांक ९ :- निवृत्ती वेतन नोंदवहीतील अनियमितता**
**(शिक्षण विभाग पंचायत समिती निफाड)**

पंचायत समिती निफाड अंतर्गत गटशिक्षण विभागाकडील निवृत्ती वेतन प्रकरणांची तपासणी करतांना खूप मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून आल्या. त्या सारांशाने खालीलप्रमाणे –

१) निवृत्ती वेतन प्रदान नोंदवही (एपीपी – १०) ठेवलेली नाही.

२) निवृत्ती वेतन लेखापरीक्षण नोंदवही (एपीपी – ९) ह्या नोंदवहीत मागील नोंदवही वरुन नोंदी घेतांना ब-याच चुका झालेल्या आहेत. जसे निवृत्ती वेतन धारकाचे नाव, निवृत्तीचा दिनांक, काही ठिकाणी अंशराशिकरणाची रक्कम चुकीची लिहीली गेली. या चुका टाळण्यासाठी व सतत नोंदवह्या बदलाव्या लागल्यामुळे वेळेचा पण अपव्यय होतो. या चुका टाळण्यासाठी, चालू नोंदवहीतील रकाने हे एका निवृत्ती वेतन धारकाच्या नावापूढे फक्त चार वर्षासाठीच्या आहेत. चार वर्षानंतर परत नोंदवही बदलावी लागते. हे टाळण्यासाठी निवृत्ती वेतन व कुटूंब

निवृत्ती वेतन असे अंदाजे जास्तीत जास्त एका निवृत्ती वेतन धारकाला तीस वर्षांपर्यत निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतन चालू असते. त्यासाठी नोंदवहीत प्रत्येक निवृत्ती वेतन धारकाच्या नावापूढे कमीत कमी तीस वर्ष नोंदी घेता येतील येवढे रकाने कोरी सोडावीत. नोंदवहीत प्रत्येक निवृत्ती वेतन धारकाची माहिती पूर्ण लिहावी, वेळोवेळी निवृत्ती वेतनांत झालेल्या बदलाच्या नोंदी सदर नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. त्यामुळे भविष्यात होणा-या चुका टाळता येतील. निवृत्ती वेतन धारकाच्या मृत्यू नंतर कुटूंब निवृत्ती वेतन धारकाचे नाव व संपूर्ण तपशिल त्यावरच लिहावा. त्यामुळे उपरोक्त सतत होणा-या चुका टाळता येतील व कामाचा ताण पण कमी होऊ शकेल.

३) काही निवृत्ती वेतन धारकांचे व कुटूंब निवृत्ती वेतन धारकांचे पि.पि.ओ. मागील चार ते पाच वर्षांपासून भरलेले नाहीत. काही पि.पि.ओ. फक्त निवृत्ती वेतन धारकाचे नाव लिहून कोरेच ठेवलेले आहेत. कर्मचा-याच्या सेवापुस्तकांइतकेच महत्त्वाचे, निवृत्ती वेतन धारकाचे पि.पि.ओ. आहेत. ते पूर्ण झाले किंवा नाही, हे तपासण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखांची आहे. सर्व पि.पि.ओ. अचूक पूर्ण भरुन, पुढील लेखापरीक्षणाचे वेळी दाखवावेत.

४) ज्या कर्मचा-यांना निवृत्ती वेतन घेऊन पंधरा वर्ष पूर्ण झालेली आहेत, अशा कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन देयकात अंशराशीकृत निवृत्ती वेतन दिलेले आहे. परंतु नोंदवहीला कुठलीही नोंद नाही. त्यामुळे सदर व्यक्तीला निवृत्ती वेतन घेऊन १५ वर्षे पूर्ण झालेली आहेत किंवा नाही, याची पडताळणी करता आलेली नाही. निवृत्ती वेतनाचे आदेश बँकेनिहाय नस्तीबध्द केलेले नाहीत. त्यामुळे लेखापरीक्षण करतांना ब-याच अडचणी आल्या व वेळेचा अपव्यय झाला. पुढील लेखापरीक्षणाचे वेळी सर्व निवृत्ती वेतन आदेश व ज्या कर्मचा-यांचे सुधारीत निवृत्ती वेतन आदेश असतील तर ते, सर्व बँकनिहाय नस्तीबध्द करावेत.

५) ब-याच निवृत्ती वेतन धारकांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटूंबियांना कधीपासून कुटूंब निवृत्ती वेतन दिले याची, नोंदवह्या व पिपिओ अपूर्ण असल्यामुळे खात्री करता आलेली नाही.

उपरोक्त अनियमिततांमुळे निवृत्ती वेतन धारकांना / कुटूंब निवृत्ती वेतन धारकांना दिल्या गेलेल्या निवृत्ती वेतनाची रक्कम अचूक आहे किंवा नाही याची खात्री पुढील लेखापरीक्षणाचेवेळी करुन द्यावी.

३ शिक्षण

---

## मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९(ब) खालील अनियमितता.

---

**परिच्छेद क्रमांक १० :- नागरे वस्ती रस्ता दुरुस्ती करणे. ता. निफाड**

| | |
|---|---|
| कामाचे नाव | नागरे वस्ती रस्ता दुरुस्ती करणे. ता. निफाड |
| प्रशासकीय मान्यता | पंचायत समिती ठराव क्रमांक १२८८/८.१०.२००७ |
| तांत्रिक मान्यता | १४/८.१०.२००७ रुपये १०,५००/- |

| | |
|---|---|
| मक्तेदाराचे नाव | चे. किर्ती मजूर सह. संस्था मर्या. खानगाव थडी |
| कामाचे आदेश | दिनांक ३१.१.२००८ |
| कामाची मुदत | दिनांक २८.२.२००८ |
| काम पूर्ण दिनांक | २२.२.२००८ |
| मोजमाप पुस्तिका व पृष्ठ क्रमांक | ४९१ |
| अंतिम प्रमाणक क्रमांक व दिनांक | ३/२६.३.२००८ रुपये १०,३००/- |

उपरोक्त कामावरील खर्चाबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

उपरोक्त कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील सन २००५ – २००६ ची दरसूची वापरण्यात आलेली आहे. सदर कामासाठी वापरण्यात आलेल्या मुरुम वाहतुकीसंदर्भात (लिडचार्ज) दिलेल्या अंतराबाबत दर जादा नमुद करण्यात आला आहे.

| **दरपृथ्थकरण** | | |
|---|---|---|
| **अंदाजपत्रकात नमुद** | | **प्रत्यक्ष अनुज्ञेय** |
| मुळ दर मुरुम | २६.०० प्रति घ.मी. | २६.०० प्रति घ.मी. |
| वाहतूक | ३.५ किमी ८१.९५ प्रति घ.मी. | ७१.२५ प्रति घ.मी. |
| **एकूण** | **१०७.९५ प्रति घ.मी.** | **९७.२५ प्रति घ.मी.** |

अंदाजपत्रकात नमुद केलेला दर १०७.९५ वजा अनुज्ञेय दर ९७.२५ = १०.७० प्रति घ.मी. जादा प्रदान झालेला आहे. वरील कामासाठी ६०.०० घ.मी. मुरुमाचा वापर केलेला आहे. त्यामुळे ६०.०० X १०.७० = रुपये ६४२.०० एवढी मुरुमाच्या वाहतुकीच्या खर्चापोटी मक्तेदारास जादा प्रदान झालेली रक्कम वसूल करुन पंचायत समिती वाढीव उपकर खाती जमा करुन अनुपालन दर्शवावे.

पंचायत समिती वाढीव उपकर
वसूलपात्र रक्कम रुपये ६४२/-

---

**परिच्छेद क्रमांक ११ :- शिरसगाव अंतर्गत रस्ता दुरुस्ती करणे. ता. निफाड**

| | |
|---|---|
| कामाचे नाव | शिरसगांव अंतर्गत रस्ता दुरुस्ती करणे. ता.निफाड |
| प्रशासकीय मान्यता | पंचायत समिती ठराव क्रमांक १२७३/६.१०.२००७ |
| तांत्रिक मान्यता | १२/६.१०.२००७ रुपये १०,५००/- |
| मक्तेदाराचे नाव | चे. रेणुकादेवी माता मजूर सह. संस्था मर्या. आहेरगाव |
| कामाचे आदेश | दिनांक २२.१०.२००७ |
| कामाची मुदत | दिनांक २१.११.२००७ |
| काम पूर्ण दिनांक | दिनांक १८.११.२००७ |
| मोजमाप पुस्तिका व पृष्ठ क्रमांक | २०६ |

| | |
|---|---|
| अंतिम प्रमाणक क्रमांक व दिनांक | २/१.१२.२००७ रुपये १०,५००/- |

उपरोक्त कामावरील खर्चाबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

वरील कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील सन २००५ – २००६ ची दरसूची वापरण्यात आलेली आहे. सदर कामासाठी वापरण्यात आलेल्या मुरुम वाहतुकीसंदर्भात (लिडचार्ज) दिलेल्या अंतराबाबत दर जादा नमुद करण्यात आला आहे.

| **दरपृथ्थकरण** | | |
|---|---|---|
| **अंदाजपत्रकात नमुद** | | **प्रत्यक्ष अनुज्ञेय** |
| मुळ दर मुरुम | (२५५/३९) २६.०० प्रति घ.मी. | २६.०० प्रति घ.मी. |
| वाहतूक | ७ किमी १२०.०४ प्रति घ.मी. | १०१.७४ प्रति घ.मी. |
| **एकूण** | **१४६.०४ प्रति घ.मी.** | **१२७.७४ प्रति घ.मी.** |

अंदाजपत्रकात नमुद केलेला दर १४६.०४ अनुज्ञेय दर १२७.७४ = रुपये १८.३० प्रति घ.मी. जादा प्रदान झालेला आहे. वरील कामासाठी ५६.२५ घ.मी. मुरुमाचा वापर केलेला आहे. त्यामुळे ५६.२५ x १८.३० = रुपये १,०४६.७६ एवढी रक्कम मुरुमाच्या वाहतुकीच्या खर्चापोटी मक्तेदारास जादा प्रदान झालेली सदरची रक्कम वसूल करुन पंचायत समिती वाढीव उपकर खाती जमा करुन अनुपालन दर्शवावे.

पंचायत समिती वाढीव उपकर
वसूलपात्र रक्कम रुपये १,०४६.७६

---

**परिच्छेद क्रमांक १२ :- खेडलेझुंगे के.टी. वेअरलगत रस्ता दुरुस्ती करणे. ता. निफाड**

| | |
|---|---|
| कामाचे नाव | खेडलेझुंगे के.टी. वेअरलगत रस्ता दुरुस्ती करणे. |
| प्रशासकीय मान्यता | पंचायत समिती ठराव क्रमांक १६४५/१७.१२.२००७ |
| तांत्रिक मान्यता | २४/१८.१२.२००७ रुपये १०,३००/- |
| मक्तेदाराचे नाव | चे. सप्तश्रृंगी मजूर सह. संस्था मर्या. देवगाव |
| कामाचे आदेश | दिनांक २८.१२.२००७ |
| कामाची मुदत | दिनांक २७.१.२००८ |
| काम पूर्ण दिनांक | दिनांक २१.१.२००८ |
| मोजमाप पुस्तिका व पृष्ठ क्रमांक | ४६० |
| अंतिम प्रमाणक क्रमांक व दिनांक | १/१०.३.२००८ रुपये १०,१००/- |

उपरोक्त कामावरील खर्चाबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

उपरोक्त कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील सन २००५ – २००६ ची दरसूची वापरण्यात आलेली आहे. सदर कामासाठी वापरण्यात आलेल्या मुरुम वाहतुकी संदर्भात (लिडचार्ज) दिलेल्या अंतराबाबत दर जादा नमुद करण्यात आलेला आहे.

| दरपृथ्थकरण | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकात नमुद | | प्रत्यक्ष अनुज्ञेय |
| मुळ दर मुरुम | २६.०० प्रति घ.मी. | २६.०० प्रति घ.मी. |
| वाहतूक | ५ किमी १०१.०३ प्रति घ.मी. | ८४.२९ प्रति घ.मी. |
| **एकूण** | **१२७.०३ प्रति घ.मी.** | **११०.२१ प्रति घ.मी.** |

अंदाजपत्रकात नमुद केलेला दर १२७.०३ अनुज्ञेय दर ११०.२९ = रुपये १६.७४ प्रति घ.मी. जादा प्रदान झालेला आहे. वरील कामासाठी ६०.०० घ.मी. मुरुमाचा वापर करण्यात आलेला आहे. त्यामुळे १६.७४ x ६० = रुपये १,००४.४० एवढी मुरुमाच्या वाहतुकीच्या खर्चापोटी मक्तेदारास जादा प्रदान झालेली रक्कम वसूल करुन पंचायत समिती वाढीव उपकर खाती जमा करुन अनुपालन दर्शवावे.

पंचायत समिती वाढीव उपकर
वसूलपात्र रक्कम रुपये १,००४.४०

---

**<u>परिच्छेद क्रमांक १३ :- बोचरे वस्ती ते गव्हाणे वस्ती रस्ता दुरुस्ती करणे. ता. निफाड</u>**

| | |
|---|---|
| कामाचे नाव | नागरे वस्ती रस्ता दुरुस्ती करणे. ता. निफाड |
| प्रशासकीय मान्यता | पंचायत समिती ठराव क्रमांक २४१/२७.३.२००८ |
| तांत्रिक मान्यता | २६/२७.३.२००८ रुपये १०,५००/- |
| मक्तेदाराचे नाव | चे. सप्तश्रृंगी माता मजूर सह. संस्था मर्या. देवगांव |
| कामाचे आदेश | दिनांक २७.३.२००८ |
| कामाची मुदत | दिनांक २४.४.२००८ |
| काम पूर्ण दिनांक | दिनांक ३१.३.२००८ |
| मोजमाप पुस्तिका व पृष्ठ क्रमांक | ८१७ |
| अंतिम प्रमाणक क्रमांक व दिनांक | १२/३१.३.२००८ रुपये १०,१५०/- |

उपरोक्त कामावरील खर्चाबाबत खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

उपरोक्त कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील सन २००५ – २००६ ची दरसूची वापरण्यात आलेली आहे. सदर कामासाठी वापरण्यात आलेल्या मुरुम वाहतुकी संदर्भात (लिडचार्ज) दिलेल्या अंतराबाबत दर जादा नमुद करण्यात आला आहे.

| दरपृथ्थकरण | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकात नमुद | | प्रत्यक्ष अनुज्ञेय |
| मुळ दर मुरुम | २६.०० प्रति घ.मी. | २६.०० प्रति घ.मी. |
| वाहतूक | ५ किमी १०१.०३ प्रति घ.मी. | ८४.२९ प्रति घ.मी. |
| **एकूण** | **१२७.०३ प्रति घ.मी.** | **११०.२९ प्रति घ.मी.** |

अंदाजपत्रकात नमुद केलेला दर १२७.०३ अनुज्ञेय दर ११०.२९ = रुपये १६.७४ प्रति घ.मी. जादा प्रदान झालेला आहे. वरील कामासाठी ६०.०० घ.मी. मुरुमाचा वापर केलेला आहे. त्यामुळे १६.७४ X ५९.०० = रुपये ९८८.२० एवढी रक्कम मुरुमाच्या वाहतुकीच्या खर्चापोटी मक्तेदारास जादा प्रदान झालेली रक्कम वसूल करुन पंचायत समिती वाढीव उपकर खाती जमा करुन अनुपालन दर्शवावे.

पंचायत समिती वाढीव उपकर
वसूलपात्र रक्कम रुपये ९८८.२०/-

---

**परिच्छेद क्रमांक १४ :- व्यवसाय कर कपात कमी दराने केल्याबाबत.**

पंचायत समिती निफाड यांनी प्रमाणक क्रमांक ५९ दिनांक १४.९.२००७ अन्वये कंत्राटी ग्रामसेवक यांचे मानधन माहे जूलै २००७ रक्कम रुपये ४७,७७९/- प्रदान केले आहे. सदर देयकात प्रति ग्रामसेवक रुपये २,६००/- इतके मानधन अदा करण्यात आले असून रुपये ३०/- दराने व्यवसाय कर आकारणी करण्यात आलेली आहे.

मा. आयुक्त, व्यवसाय कर, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्रमांक पी.एफ.टी./२००६/पी.टी./ॲडम-७/१५/बी २११ दिनांक २५.५.२००६ नुसार रुपये २,५००/- पेक्षा जास्त वेतन घेणा-या (व रुपये ३,५०१/- पेक्षा कमी) कर्मचा-यांना रुपये ६०/- प्रति माह व्यवसाय कर आकारणी करणे आवश्यक आहे.

सोबत जोडलेल्या विवरणपत्र क्रमांक “ १ ” नुसार एकूण ३८ कंत्राटी ग्रामसेवकांची एकूण रुपये ३२,३१०/- कमी कपात केलेली व्यवसाय कराची रक्कम वसूल करुन शासनास भरणा करुन अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

वसूलपात्र रक्कम रुपये ३२,१३०/-
००२८ व्यवसाय कर

---

**परिच्छेद क्रमांक १५ :- हातपंप, विद्युतपंप वर्गणी थकबाकीबाबत.**

पंचायत समिती, निफाडच्या सन २००७ – २००८ साठीच्या हातपंप / विद्युतपंप देखभाल दुरुस्तीची वर्गणी नोंदवहीची पडताळणी केली असता या सोबतच्या परिशिष्ट क्रमांक “ २ ” मध्ये दर्शविणेत आलेप्रमाणे सन २००३ – २००४ पासून २००५ – २००६ या कालावधीची हातपंप देखभाल दुरुस्ती वर्गणी रक्कम रुपये ३६,६२९/- व विद्युतपंपाची वर्गणी रक्कम रुपये ९८,२६४/- अशी एकुण रक्कम रुपये १,३४,९०३/- अदयापही ग्रामपंचायतीकडून वसुल करणे बाकी आहे.

याबाबत ग्रामपंचायत पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक २ चे आदेश क्रमांक भुजल १०९५/ प्र.क्र. २१७/४३ दिनांक १७.१.१९९६ अन्वये हातपंप / विद्युतपंपाची देखभाल व दुरुस्तीची प्रलंबित वर्गणी संबंधित ग्रामपंचायतीकडून रोख स्वरुपात अथवा देय अनुदानातुन सत्वर वसुल करावी व पुर्तता दाखवावी.

---

**परिच्छेद क्रमांक १६ :- शिल्लकी रक्कमेची सुरक्षितता व पडताळणीबाबत.**

पंचायत समिती निफाड यांचे कार्यालयातील रोखपालीची रोखवही नमुना नंबर ४ चे सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षण करता गटविकास अधिकारी, निफाड यांनी रोखवहीतील शिल्लक रक्कम व प्रत्यक्ष रोखपेटीतील शिल्लक रक्कम यांची अचानक पडताळणी करुन त्या अर्थाचे प्रमाणपत्र रोखवहीत नमुद केलेले नाही.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ४२ नुसार कार्यालय प्रमुखाने किमान दर ३ महिन्यातून एकदा कार्यालयातील रोखपालाची रोखवही व रोखपेटीतील शिल्लक रक्कमेची अचानक पडताळणी करुन रोखपेटीतील शिल्लक रक्कम रोखवहीतील शिल्लक रक्कम बरोबर असल्याची खात्री करणे आवश्यक आहे. तसेच पडताळणीअंती आढळून आलेली रक्कम रोखवहीशी जुळते किंवा कसे याबाबत प्रमाणपत्र रोखवहीत दिनांकीत स्वाक्षरीसह नमुद करणे आवश्यक आहे.

तथापि उपरोक्तप्रमाणे कार्यवाही गटविकास अधिकारी निफाड यांनी केलेली नाही. रोखपालाच्या ताब्यात पंचायत समितीची मोठ्या रक्कमेची जबाबदारी सोपविण्यात आलेली असल्याने त्यांचेवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी अचानक पडताळणी करणे आवश्यक आहे.

तरी या अनियमिततेबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे क्षमापन घेऊन नियमानुसार कार्यवाही सुरु करुन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक १७ :- अनामत रक्कमा व्यपगत न केल्याबाबत.**

पंचायत समिती निफाड यांचेकडील अनामत नोंदवहीचे लेखापरीक्षण करता सोबत जोडण्यात आलेल्या विवरणपत्र क्रमांक " ३ " मध्ये नमुद केल्यानुसार दिनांक ३१.३.२००८ अखेर रुपये ९८,७२,७६९/- रक्कम जमा दर्शविली आहे.

उपरोक्त नोंदवहीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नमुद करण्यात येत आहेत.

१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चा नियम २०९(७) नुसार देय असलेल्या ठेव रक्कमेची मागणी तीन वर्षात न केल्यास सदरची रक्कम ठेव लेख्यातून व्यपगत करुन संकिर्ण जमा म्हणून वर्ग करणे आवश्यक आहे. तथापि पंचायत समिती निफाड यांनी अशी कार्यवाही केलेली नाही.

सन १९९९ – २००० ते २००४ – २००५ अखेरपर्यंत एकूण रु. २७,०९,८१९/- व्यपगत करणे आवश्यक आहे. याबाबत योग्य कार्यवाही करुन पुर्तता दर्शवावी.

२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चा नियम २०८(९) नुसार तीन वर्षावरील अशा व्यपगत ठेवींचे प्रदान स्थायी समितीच्या पूर्व मान्यतेशिवाय करता येत नाही. अशा परताव्याची रक्कम संकिर्ण परतावे ह्या लेखाशिर्षाखाली खर्च दर्शविणे आवश्यक आहे. परंतू पंचायत समिती निफाड यांनी व्यपगत रक्कमेची नोंद नसल्याने सदर प्रमाणाबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आलेली नाही.

३) कर्मचारी भविष्य निर्वाह निधीच्या जिल्हा परिषद कार्यालयाकडून प्राप्त प्रदानाच्या रक्कमा ह्या प्रथम ठेव सदरी जात दर्शवून नंतर प्रदान करण्यात येतात. अशाप्रकारे ठेव सदरी सन २००२ – २००३ ची रक्कम रुपये १,७२७/- व सन २००४ – २००५ ची रक्कम रुपये ११,९६१/- अशी एकूण १३,६८८/- ब-याच कालावधीपासून ठेव सदरी जमा करुन ठेवली आहे. सदरची रक्कम ही संबंधित कर्मचा-यांना अदा न होता भविष्य निर्वाह निधी लेख्याबाहेर ठेवण्यात आलेली असल्याने संबंधित कर्मचा-यांचे आर्थिक नुकसान होत आहे. याबाबत आवश्यक ती कार्यवाही करुन रक्कम योग्य त्या सदरी जमा करुन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे क्षमापन घेऊन पुर्तता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक १८ :- जवाहर विहीरी योजने अंतर्गत अपूर्ण विहिरी बांधकामाबाबत.**

सोबतच्या परिशिष्ट क्रमांक “ ३ ” मध्ये नमुद केल्याप्रमाणे लघुपाटबंधारे उपविभागाकडील दिनांक ३१.३.२००८ अखेर एकूण ४ कामे प्रलंबित असून त्यांपोटी रक्कम रुपये १,०१,१७१/- खर्च झालेली आहे.

१) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग आदेश क्र. नाशिक/जचिअस-१२९८/प्र.क्र.१०४/ रोहयो-१० दिनांक १.७.१९९८ मधील परिच्छेद क्रमांक १७ व १८ नुसार विहिरींचे काम प्रशासकीय मान्यतेच्या आदेशातील दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत सुरु करुन पुढील १२ महिन्यांच्या आत पूर्ण करावयाचे असतांना वरील प्रकरणी या शासन आदेशांचे पालन झालेले नाही.

२) निफाड उपविभागांतर्गत एकूण ४ विहीरींचे बांधकाम अपूर्ण आहे. सन २००४ – २००५ पासून सन २००७-२००८ अखेरपर्यंत विहीरी अपूर्ण असल्याने प्रत्येक लाभार्थ्यांकडून विहीत मुदतीत काम पूर्ण न झालेल्या कालावधीपासून अवरसचिव, नियोजन विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. ६५ दिनांक १३.९.२००१ अन्वये १८ % दराने व्याज आकारणी करुन दंड वसुल करण्यांत यावा.

३) सन २००७-०८ मध्ये एकूण रक्कम रुपये ४,४७,०००/- इतके अनुदान प्राप्त झाले असून त्यापैकी रु.१,४६,०६१/- इतके खर्च झाले आहे व शिल्लक रक्कम रु. ३,००,९३९/- इतकी रक्कम मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हापरिषद, नाशिक यांना प्रमाणक क्रमांक १२५० दिनांक ३१.३.२००८ नूसार अखर्चित अनुदान म्हणुन परत केलेली आहे. सदरची रक्कम शासकीय लेखाशिर्षाखाली भरणा न करता मुख्य लेखा व वित्त अधिकारी नाशिक यांना परत केलेली असल्याने रक्कम शासकीय लेखाशिर्षाखाली भरणा केलेली असल्याची खात्री करता येत नाही. सदरची रक्कम शासकीय लेखाशिर्षाखाली भरणा केल्याचे चलन लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करण्यात यावे.

४) उपरोक्त नमुद परिशिष्टानुसार एकूण ४ कामे अपूर्ण असतांना अनुदान परत करणे नियमबाहय आहे. उपविभाग लघुपाटबंधारे विभागाने योग्य ते नियोजन न केल्याने अनुदान खर्च झालेले नाही. सदर बाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन शासनाचे क्षमापन घ्यावे.

सन २००६ – २००७ मध्ये परिच्छेद क्रमांक ३३ नुसार आक्षेप घेऊनही काहीही कार्यवाही केलेली नाही. तरी याबाबत संबंीतांची जबाबदारी निश्चित करुन उचित कारवाई व्हावी.

वरील आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखविण्यांत यावे.

---

**परिच्छेद क्रमांक १९ :- ग्रामपंचायत स्तरावरील अफरातफर प्रकरणे व पंचायत स्तरावरील प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांमध्ये अंतर्भूत रक्कमांबाबत.**

अर्धसमास पत्र क्रमांक ११ दिनांक ७.८.२००८ अनवये पंचायत समिती निफाडचे कार्यक्षोत्रातील प्रलंबित अफरातफर प्रकरणे, निकाली प्रकरणे, प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे, त्यावर झालेला प्रकरणनिहाय खर्च, लागलेले निकाल, प्रलंबित प्रकरणे, न्यायालयीन प्रकरणाचे संभाव्य दायित्वाची रक्कम इत्यादींबाबत माहिती मागविण्यात आली होती. (परिशिष्ट क्रमांक “ ४ ” मध्ये नमुद माहितीप्रमाणे)

पंचायत समिती निफाडने उपरोक्त अर्धसमास पत्रांस अनुसरुन सादर केलेल्या विवरणपत्रांनुसार उपलब्ध केलेली माहितीनुसार यावरील अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

अ) एकूण ३ न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असून सदर प्रकरणे निकाली काढण्यासाठी कुठलीही ठोस कार्यवाही केलेली नाही. नोंदवही अपूर्ण असल्याने न्यायालयीन प्रकरणनिहाय खर्च, त्यांचे लागलेले निकाल, निकालाअंती संभाव्य दायित्वाची रक्कम याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

ब) १) एकूण ५७ प्रकरणांपैकी २४ प्रकरणे निकाली निघाली असून न्यायालयात ३ प्रकरणे प्रलंबित आहेत तसेच पंचायत समिती स्तरावर २१ प्रकरणे प्रलंबित आहेत. ग्रामनिधी अपहारातील रक्कम रुपये १,००,८३५/- व जवाहर रोजगार योजनेतील रक्कम रुपये ३,६०,३६६/- अशी एकूण रक्कम रुपये ४,६१,२०१/- वसूली प्रलंबित आहे. सदर अपहार रक्कम वसूलीबाबत कोणतीही ठोस कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

२) सदरच्या अपहारीत रक्कमांच्या प्रकरणांशी संबंधित बहुतांशी कर्मचारी सेवानिवृत तसेच मयत झाले असल्याने त्या रक्कमा वसूलीबाबत काहीही नियोजन केलेले दिसून येत नाही.

३) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-२००५/प्र.क्र.२६२/पंरास दिनांक ३.९.२००५ नुसार अपहाराची रक्कम वसूल करणे व संबंधितांकडून फौजदारी गुन्हे दाखल करणे आवश्यक आहे. तथापि या अपहार अथवा गैरव्यवहार प्रकरणांबाबत बहुतांशी प्रकरणी वेळीच योग्य ती कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. शासनाच्या आदेशांचा यामुळे भंग झाला आहे.

वरील त्रुटींमुळे एकूण अपहारीत रक्कम वसूली न झाल्याने शासनाचे नुकसान झालेले आहे. याबाबत जबाबदारी निश्चित करुन उचित प्रशासकीय कार्यवाही करावी. या गंभीर अनियमिततेबाबत शासनाचे क्षमापन घ्यावे व त्यावरील कार्यवाही अहवालांसह अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

---

**परिच्छेद क्रमांक २० :- पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती सराव परिक्षा सन २००७ – २००८**

पंचायत समिती निफाड यांचे सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षात वाढीव उपकराच्या सुधारीत अंदाजपत्रकामध्ये ठराव क्रमांक १० दिनांक २७.१.२००८ अन्वये शिक्षण विभागातील रुपये ५०,०००/- चे तरतुदीस मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार सन २००७ – २००८ या वर्षात पूर्व प्राथमिक शिष्यवृत्तीच्या दोन सराव चाचण्यांकरीता प्रश्नपत्रिका व उत्तर पत्रिका छपाई व एकूण ६३५७ विद्यार्थ्यांची सराव चाचणी घेण्याकरीतां रुपये ३२,४२०/- चा खर्च प्रमाणक क्रमांक ६ दिनांक १५.१.२००८ अन्वये करण्यात आलेला आहे.

त्यासाठी पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी यांनी तालुक्यातील १) शिष्यवृत्ती ऑफसेट, निफाड, २) योगेश प्रिंटर्स, निफाड, ३) अयोध्या प्रिंटर्स, सायखेडा यांचेकडून प्रश्नपत्रिका व उत्तर पत्रिका छपाईसाठी खालीलप्रमाणे दरपत्रके मागविण्यात आली.

| अ. क्र. | पुरवठादाराचे नाव | वस्तुचा तपशील | प्रत्येक नगाची किंमत | एकूण किंमत संचाची |
|---|---|---|---|---|
| १ | शिष्यवृत्ती ऑफसेट, निफाड | सराव चाचणी प्रत्येकी ६३५७ | २.५५ | ३२,४२०.०० |
| २ | योगेश प्रिंटर्स, निफाड | सराव चाचणी प्रत्येकी ६३५७ | ३.०५ | ३८,७७७.७० |
| ३ | अयोध्या प्रिंटर्स, सायखेडा | सराव चाचणी प्रत्येकी ६३५७ | ६.०० | ७६,१८४.०० |

उपरोक्त तपशीलानुसार सर्वात कमी दर शिवस्मृती ऑफसेट यांचे असल्याने त्यांचे कडून छपाई काम करुन घेण्यात आले.

यासंदर्भात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत:

१) निफाड गटातील एकूण ३० केंद्रांसाठी ६३५७ एवढया प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका छपाई केल्या आहेत. तथापि ३० केंद्रापैकी उपलब्ध दस्तऐवज म्हणजेच शिक्षकाचे नाव, केंद्र, शाळा व स्वाक्षरी पहाता फक्त ११ केंद्र प्रमुखांनीच केवळ २२६८ प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका संच ताब्यात घेतल्याचे स्पष्ट होते. उर्वरीत ४०८९ संच केंद्र प्रमुख यांचे ताब्यात दिल्याबाबत पोहोच नाही.

२) वरील प्रश्नपत्रिका व उत्तर पत्रिका केंद्र प्रमुखाचे ताबयात दिल्याबाबत पोहोच दर्शवून अनुपालन दर्शवावे. पाहोच व पूर्णत: उपयोग झालेला असल्यास चुकीच्या नियोजनासाठी संबंधितांकडून प्रति संच २.५५ प्रमाणे ४०८९ संचाची किंमत रुपये (१०४२७ X २) = २०,८५४/- एवढी रक्कम वसूलपात्र ठरते.

योग्य पुर्ततेसाठी खर्च रुपये ३२,४२०/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

लेखाशिर्ष
वाढीव उपकर
आक्षेपाधिन रक्कम रुपये ३२,४२०/-

---

**परिच्छेद क्रमांक २१ :- विज देयकातील विज शुल्क आकारणीबाबत.**

पंचायत समिती, निफाड यांनी प्रमाणक क्रमांक ८० दिनांक २४.८.२००७ अनवये विज देयक रुपये २,६८०/- प्रदान केले आहे. सदर विज देयकात रुपये २८३.६० विज शुल्क आकारणी करण्यात आलेली आहे.

प्रत्येक विज देयकावर महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५ चा नियम १४७ टिप ३ नुसार विज शुल्काची आकारणी केली नसल्याची खात्री केल्याबाबत प्रमाणपत्र नमुद करणे आवश्यक आहे.

तथापि पंचायत समिती, निफाड यांनी विज मंडळाने चुकीने आकारणी केलेल्या विज शुल्कासह देयकाचे प्रदान केले आहे. विद्युत मंडळाचे संगणकीय प्रणालीद्वारे विद्युत देयके तयार होत असल्याने जोपर्यंत विद्युत शुल्क माफीबाबत मंडळाकडून योग्य तो बदल संगणकावर केला जाणार नाही, तोपर्यंत वरीलप्रमाणे कमी - अधिक प्रमाणात विज शुल्काची आकारणी दरमहा केली जाणार असल्याने प्रतिमाह आकारणी होणा-या रक्कमेचा विचार करता मोठ्या रक्कमेचे नुकसान झाले असून भविष्यातही होणार असल्याने ही बाब विद्युत मंडळाच्या निदर्शनास आणून विजशुल्क आकारणी कायमस्वरुपी बंद करुन घेऊन पुर्तता दर्शवावी.

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९(क) खालील अनियमितता.

---

**परिच्छेद क्रमांक २२ :- थकीत अग्रीम रक्कमा वसूलीबाबत.**

पंचायत समिती निफाड यांचेकडील अग्रीम नोंदवहीचे लेखापरीक्षण करता या अहवालासोबत जोडण्यात आलेल्या विवरणपत्र क्रमांक “ ४ ” नुसार दिनांक ३१.३.२००८ अखेर रक्कम रुपये १,३७,०००/- कर्मचारी अग्रीम व धान्य अग्रीम इत्यादी प्रकारच्या अग्रीमाच्या स्वरुपात प्रलंबित आहेत.

शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक लेपुअ/१०९२/ प्र.क्र.१४६९/३० दिनांक २६.२.१९९३ अन्वये दिलेल्या सुचनेनुसार गटविकास अधिकारी यांनी ठोस कार्यवाही करुन थकीत अग्रीम रक्कमेची वसूली करणे आवश्यक आहे.

उपरोक्त एकूण प्रलंबित अग्रीम रक्कम रुपये १,३७,०००/- पैकी काही रक्कमा या सन २००१ – २००२ पासून प्रलंबित असून वसूलीबाबत मागील सन २००६ – २००७ च्या लेखापरीक्षणात परिच्छेद क्रमांक १८ नोंदवूनही अद्यापपावेतो कोणतीही ठोस कार्यवाही वसूलीसाठी करण्यात आलेली नाही.

तरी गटविकास अधिकारी यांनी सन २००१ – २००२ ते २००७ – २००८ या कालावधीतील थकीत अग्रीम वसूलीबाबत ठोस कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९(ड) खालील अनियमितता.

---

**परिच्छेद क्रमांक २३ :- नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेनुसार कपात केलेल्या अशंदान रक्कमेबाबत.**

पंचायत समिती, निफाड यांनी दिनांक १.११.२००५ नंतर सेवेत दाखल झालेल्या कर्मचा-यांची निवृत्ती वेतन अंशदानाची रक्कम कपात करुन दिनांक ३१.३.२००८ अखेर रुपये ३,२९,११०/- ठेव सदरी जमा केलेली आहे.

या संदर्भात अभिप्राय नमुद करण्यात येत आहेतः

१) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो-१००७/१८/सेवा-४/ दिनांक ७.७.२००७ अन्वये नवीन परिभाषित अशंदान निवृत्ती वेतन योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती निश्‍चित करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयातील परिच्छेद ८ नुसार सर्व आहरण व संवितरण अधिका-यांनी दिनांक १.११.२००५ नंतर सेवेत दाखल झालेल्या कर्मचा-यांची माहिती नमुना नंबर १ मध्ये प्राप्त करुन राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई यांना सादर करुन सदर कर्मचा-यांचा ''निवृत्ती वेतन लेखा क्रमांक'' प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

तसेच उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक २८ नुसार जिल्हा परिषदेतील कर्मचा-यांना योग्य त्या फेर फारांसह सदर योजना लागू करण्यात अली असून कर्मचा-यांना अंशदानाइतके समतुल्य अशंदान राज्य अभिलेख देखभाल अभिकरणास जमा करणे आवश्यक आहे.

तथापि पंचायत समिती, निफाड यांनी राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई यांचेकडून अद्यापपावेतो संबंधित कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन लेखा क्रमांक प्राप्त करुन घेतलेले नाही, कर्मचा-यांकडून कपात केलेली अंशदानाची रक्कम ठेव सदरी जमा ठेवलेली आहे. तसेच कर्मचारी अशंदानाइतके समतुल्य जिल्हा परिषदेचे अंशदान प्रदान करण्याबाबत कोणतीही तरतुद केलेली नाही.

सदर अशंदान हे कर्मचा-यांना भविष्यात देय होणा-या निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाशी निगडीलत असल्याने तसेच कपात केलेल्या अंशदान व संस्थेचे समतुल्य अंशदान व त्यावर देय होणारे व्याज याबाबतची सर्वस्वी जबाबदारी ही राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई यांचेकडे रक्कम जमा होईपावेतो कार्यालय प्रमुख या नात्याने पंचायत समितीच्या गटविकास अधिका-यांची आहे.

तरी संबंधित कर्मचा-यांचे निवृत्ती लेखा क्रमांक प्राप्त करणेसाठी आवश्यक ती कार्यवाही त्वरीत पूर्ण करुन ठेव सदरी जमा रक्कम व समतुल्य अंशदान राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई यांचेकडे भरणा करुन पुतता लेखापरीक्षणास दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमाक २४ :- तालुका मास्तर यांचेकडील धनादेश रेखांकीत न करता केलेल्या प्रदानाबाबत.**

तालुका मास्तर निफाड यांचेकडील सन २००७ – २००८ मधील निवडक महिन्यांच्या धनादेश स्थळप्रतींची पडताळणी केली असता त्यांचेमार्फत प्रदान होणा-या भविष्य निर्वाह निधी अग्रीम, भविष्य निर्वाह निधी अंतिम प्रदान, प्रवासभत्ता, रजा प्रवास भत्ता, वैद्यकीय प्रतिपुर्तीच्या रक्कमा तसेच शालेय पोषण आहार मानधन इत्यादी रक्कमांचे प्रदान धनादेश रेखांकीत न करता प्रदान करण्यात आलेली आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम २५ अन्वये रुपये १,०००/- चे पुढील सर्व रक्कमेचे प्रदान हे रेखांकीत धनादेशाद्वारे करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. या अनियमिततेस मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे क्षमापन घेऊन अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २५ :- निवृत्ती वेतन प्रदान आदेशात व प्रत्यक्ष निवृत्ती वेतन प्रदान रक्कमेतील तफावतींबाबत.**

पंचायत समिती निफाड अंतर्गत शिक्षण विभागाकडील निवृत्ती वेतन प्रदानाबाबत अभिलेख्यांची पडताळणी केली असता श्रीमती. फुलाबाई यशवंत गांगुर्डे यांच्या कुटूंबनिवृत्ती वेतन प्रदान आदेशात दिनांक १.१.१९९६ पासून सुधारीत कुटूंब निवृत्ती वेतनाचा दर रुपये १,२७५/- नमुद केलेला आहे. मात्र माहे फेब्रुवारी २००८ चे निवृत्ती वेतन देयकात श्रीमती. गांगुर्डे यांना कुटूंब निवृत्ती वेतन रुपये १,३७९/- दराने प्रदान करण्यात आले आहे.

उपरोक्त तफावत पहाता प्रथमदर्शनी श्रीमती. गांगुर्डे यांना रुपये १०४/- दराने व त्यावरील महागाई भत्ता दिनांक १.१.१९९६ पासून अतिप्रदान झाले असल्याचे निदर्शनास येते.

प्रत्यक्षात वरिष्ठ लेखाअधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील आदेश क्रमांक मजिप/अर्थ/पेन्शन-१/६८९/२००३ दिनांक ३१.३.२००३ अन्वये श्रीमती. गांगुर्डे यांचे कुटूंब निवृत्ती वेतन रुपये १,३७९/- दरमहा दिनांक १.१.१९९६ पासून सुधारीत करण्यात आले आहेत.

उपरोक्त सुधारीत कुटूंब निवृत्ती वेतन मंजूरी आदेशाची नोंद निवृत्ती वेतन प्रदान आदेशात घेऊनच सुधारीत दराने कुटूंब निवृत्ती वेतन व मागील फरक प्रदान मंजूर करण्याची गटशिक्षण अधिकारी यांनी जबाबदारी पार पाडलेली नाही. उलटपक्षी पेन्शन प्रदान आदेशावर नमुद केल्याप्रमाणेच प्रदान केले जाते आहे किंवा कसे यांची खात्री गटशिक्षण अधिकारी यांनी सन २००३ ते लेखापरीक्षण इतक्या प्रदिर्घ कालावधीत केलेली नाही.

वरीलप्रमाणेच इतर निवृत्ती वेतन प्रदान आदेशात व प्रत्यक्ष पेन्शन प्रदान रक्कमेत तफावत असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी गटशिक्षणाधिकारी निफाड यांनी सर्व पेन्शन प्रदान हे पेन्शन प्रदान आदेशात नमुद केलेल्या दरानेच होत असल्याचे तसेच सर्व पेन्शन आदेशात नमुद केलेल्या दरानेच होत असल्याचे तसेच सर्व पेन्शन प्रदान आदेशात

अद्ययावत आदेशांच्या नोंदी घेतल्याची खात्री करुन कमी जादा प्रदान होत नसल्याची खात्री करुन अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २६ :- बांधकाम उपविभाग (इ व द) नोंदवह्यांबाबत**

१) नोंदवही क्रमांक ३९ :- मालमत्ता नोंदवहीत बांधलेल्या इमारतीच्या काही नोंदी घेतल्या असून त्यातील रकाने ७ ते १३ अपूर्ण आहेत.
२) नमुना क्रमांक ४० :- नोंदवही अपूर्ण असून ती पूर्ण करुन रस्त्याच्या नोंदी अद्ययावत असल्याची खात्री पटवावी.
३) नमुना क्रमांक ४१ :- मध्ये रिकाम्या जागेच्या ठिकाणी ७/१२ उतारे प्राप्त करुन त्या जागेवर अतिक्रमण झालेले नसल्याने उपअभियंता, बांधकाम विभाग ह्यांनी प्रमाणित केलेले नाही.
४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखा संहिता १९६८ चे नियम ९८ अन्वये स्थावर मालमत्तेची पडताळणी केल्याचे प्रमाणपत्र सक्षम कार्यालयाला कळविणबाबतची खात्री पटवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २७ :- दुरध्वनी नोंदवहीतील अपूर्णतेबाबत.**

पंचायत समिती निफाडकडील दुरध्वनी नोंदवहीची तपासणी केली असता संबधित विभागाने ऑगस्ट २००३ ते २००८ दुरध्वनी नोंदवही नमुना नंबर ९१ यामध्ये ठेवली असून या नोंदवहीत १ ते १२ रकाने असून यामध्ये नोंदवहीवर मीटर दर मासिक देय रक्कम, कर व दुरध्वनी देयकातील रक्कम व इतर बाबींचा मासिक गोषवारा काढलेला आहे.

सदर नोंदवहीवरील रकाने ज्या प्रयोजनासाठी असून ते रकाने भरणेत आलेले नसल्याने दुरध्वनीचा वापर कोणी, कोठे व कसा केला याचे लेखापरीक्षणांत न आढळल्याने यापुढे सदर नोंदवहीतील नियमानुसार रकाने भरणेची कार्यवाही करुन पुढील लेखापरीक्षणांत कार्यवाही केलेचे दाखविण्यांत यावे.

---

**परिच्छेद क्रमांक २८ :- सेवा तिकीटे नोंदवहीवरल दुरुस्तीबाबत.**

पंचायत समिती, निफाडकडील सन २००७ – २००८ मधील लेखा निवडक महिनेतील लेखापरीक्षण केले असता पंचायत समितीतील सामान्य प्रशासन विभागातील टपाल सेवा तिकीटे नोंदवहीमध्ये दिनांक १.९.२००७ ते ३१.३.२००८ या कालावधीत नमुना अ व ब नोंदवहीत सदर संबंधित लिपीकाने खाडाखोड व व्हाईटनरचा वापर करुन दुरुस्ती करणेत येऊन सेवा तिकीटांतील रक्कमा नोंदविल्याने यातील तफावतीचा मेळ व मासिक गोषवारा न काढल्याने याबाबतचे प्रयोजन स्पष्ट करुन सदर कालावधीतील सेवा तिकीटांचा मेळ घेऊन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखविण्यात यावा.

---

**परिच्छेद क्रमांक २९ :- लघुपाटबंधारे उपविभाग, निफाड यांचेकडील नोंदवही क्रमांक ४१ बाबत.**

लघुपाटबंधारे उपविभाग, निफाड यांचेकडील नमुना क्रमांक ४१ ची पडताळणी केली असता सदरच्या नोंदवहीतील पाझर तलाव यांचे संदर्भात संपादित / प्राप्त जमिनींचे ७/१२ उतारे उपलब्ध करुन त्या जिल्हा परिषदेच्या मालकीच्या झालेल्या असल्याबाबत उपअभियंता (लघुपाटबंधारे) उपविभाग, निफाड यांनी प्रमाणित करुन तसे अनुपालन दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक ३० :- मुदतबाहय धनादेश रदद न केलेबाबत.**

पंचायत समिती, निफाड अंतर्गत तालुका मास्तर निफाड यांचे कार्यालयातील सन २००७ – २००८ चे लेख्यांचे लेखापरीक्षण केले असता दिनांक ३१.३.२००८ अखेर एक वर्षापेक्षा जास्त कालावधीचे धनादेश खालील तपशीलाप्रमाणे वटविण्यात न आल्याने प्रलंबित राहीलेली आहेत.

धनादेश क्रमांक ४५९४४० दिनांक २.५.२००६ रक्कम रुपये ११४/-

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ३१ नुसार एक वर्षापेक्षा अधिक काळ मुदतीचे न वटलेले धनादेश रद्द करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली जमा करणे आवश्यक आहे.

तथापि पंचायत समिती निफाड अंतर्गत तालुका मास्तर निफाड यांनी मुदतीत न वटलेल्या धनादेशाची रक्कम योग्य त्या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही केली नाही.

उपरोक्त नमुद धनादेश रद्द करुन रक्कम जमा लेखाशिर्षाखाली जमा करुन पुर्तता दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक ३१ :- देयकांवर अनुदान नमुद न केल्याबाबत.**

पंचायत समिती निफाड यांचेकडील सन २००७ – २००८ मधील प्रदान देयकांचे लेखापरीक्षण केले असता देयकांचे प्रदान करतांना सदर देयकांवर प्राप्त अनुदान, झालेला खर्च व शिल्लक अनुदान याबाबत तपशील नमुद केलेला नाही.

अनुदान नोंदवही पहाता देयकांचा खर्च एकत्रितरित्या दर्शवित असल्याने देयक प्रदान करतांना त्यासाठी आवश्यक ते अनुदान उपलब्ध झालेले आहे किंवा कसे? याची खात्री लेखापरीक्षणात करता आलेली नाही.

अनुदान नोंदवहीमध्ये नमुद केल्याप्रमाणे सन २००७ – २००८ मध्ये प्राप्त अनुदान व केलेल्या एकूण खर्च हा अनुदानाच्या मर्यादित असल्याचे दिसते परंतु प्रत्यक्ष खर्च नोंदवितांना अनुदान उपलब्ध होते किंवा खर्च नोंदविल्यानंतर अनुदान प्राप्त करुन मेळ घेण्यात आला आहे. याबाबत खात्री लेखापरीक्षणात करता आलेली नाही.

तरी सन २००७ – २००८ मध्ये प्राप्त अनुदानातून अनुदानाच्या मर्यादेत खर्च झाल्याचे प्रमाणित करुन व सदर अनियमिततेस मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे क्षमापन घेऊन पुर्तता दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक ३२ :- मुदतबाह्य धनादेश रद्द न केलेबाबत.**

पंचायत समिती निफाडचे सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षणाचेवेळी अभिकरण योजना, जिल्हा निधी व जिल्हा परिषद सेस सर्वसाधारण रोखवही नमुना नंबर ७ ची पडताळणी केली असता दिनांक ३१.३.२००८ अखेर सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधीचे धनादेश वटविण्यात न आल्याने प्रलंबित राहिलेले आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ३१ नुसार सहा महिन्यापेक्षा अधिक काल मुदतीचे न वटलेले धनादेश पुनर्जीवित करुन व १ वर्षावरील धनादेश रद्द करुन योग्य त्या शिर्षाखाली जमा करणे आवश्यक आहे.

तथापि पंचायत समिती निफाड यांनी मुदतीत न वटलेल्या धनादेशांची रक्कम ज्या – त्या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही केली नाही. मुदतबाह्य धनादेशांचा तपशिल खालीलप्रमाणे –

| अभिकरण | | | जिल्हा परिषद वाढीव उपकर | | |
|---|---|---|---|---|---|
| **दिनांक** | **धनादेश क्र.** | **रक्कम** | **दिनांक** | **धनादेश क्र.** | **रक्कम** |
| ३०.३.२००७ | ३९२ | १५,१२४ | १५.५.२००७ | ६७७ | २२,६८० |
| ३०.३.२००७ | ५१४ | ५,३७८ | २८.६.२००७ | ७५४ | २,३५५ |
| ३०.३.२००७ | ५३२ | २,३८८ | २८.६.२००७ | ७५५ | २,३५५ |
| ३०.३.२००७ | ५३४ | २,४२५ | २८.६.२००७ | ७५७ | २,३५५ |
| ३०.३.२००७ | ५३६ | १,४५३ | १४.८.२००७ | ८२३ | २,००० |
| ३०.३.२००७ | ५४९ | ३,५०० | १४.८.२००७ | ८२४ | २,००० |
| ३०.३.२००७ | ५६१ | २,२८५ | १४.८.२००७ | ८२६ | २,००० |
| ३०.३.२००७ | ५६३ | २,७४० | २६.९.२००७ | ८५४ | १,००० |
| ३०.३.२००७ | ५६६ | ८,०६२ | | | |
| १०.९.२००७ | १०१ | ८८८ | | | |
| | **एकूण** | **४७,२४३** | | **एकूण** | **३६,७४५** |

तसेच जिल्हा स्थानिक निधीचे माहे सप्टेंबर २००७ ते मार्च २००८ पर्यंत ताळमेळ घेतलेला नसल्याने मुदतबाह्य धनादेशांबाबत लेखापरीक्षणात खात्री करता आलेली नाही.

वरील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे मुदतबाह्य धनादेश रद्द करुन ज्या – त्या लेखाशिर्षाखाली रक्कम जमा करुन पुर्तता दर्शवावी. यापुढे मुदतबाह्य धनादेश राहणार नाही याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

तसेच जिल्हा निधीचे माहे मार्च २००८ अखेर ताळमेळ घेऊन वरीलप्रमाणे मुदतबाह्य धनादेश रद्द करुन रक्कम ज्या – त्या लेखाशिर्षाखाली जमा करुन पुर्तता दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक ३३ :- जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले न घेतलेबाबत...**

पंचायत समिती, निफाडचे सन २००७ – २००८ या कालावधीतील परिशिष्ट क्रमांक " ५ " मध्ये नमुद केलेल्या कर्मचा-यांचे जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले घेणेत आलेले नाहीत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ४३ (३) अन्वये प्रत्येक वित्तीय वर्षाचे सुरुवातीस जामीनदार हयात व लायक असल्याचे दाखले घेणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त नमुद केलेल्या कर्मचा-यांचे जामीनदार हयात व लायक असल्याचे दाखले घेणेत आलेले नाहीत. या संदर्भात सन २००६ – २००७ या लेखापरीक्षण अहवालात आक्षेप क्रमांक ३४ नोंदवूनही पंचायत समितीचे सक्षम अधिकारी आपली जबाबदारी पार पाडत नाही. ही बाबत नियमांचे उल्लंघन करणारी आहे.

तरी उपरोक्त नियमाप्रमाणे कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक ३४ :- जूने निरुपयोगी साहित्य निर्लेखन करणेबाबत.**

पंचायत समिती निफाडचे सन २००७ – २००८ या कालावधीतील जडसंग्रह नोंदवहीची पडताळणी केली असता खालील यादीतील साहित्य निरुपयोगी आहे.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील पत्र क्रमांक अु.अं.(यां)/भुसविय/तांत्रिक-१/नस्ती/१७/०८ दिनांक २.१.२००८ अन्वये तपशिलांत नमुद केल्याप्रमाणे निरुपयोगी साहित्याचे निर्लेखन करुन खालील बाबींचे निर्लेखन किंमत (ऑफसेट व्हल्यू) उपअभियंता (यांत्रिकी) भूजल सर्वेक्षण यंत्रणा यांचेकडून निश्चित करुन त्यानुसार प्रस्ताव सादर करणे आवश्यक असून सदरचे साहित्य निर्लेखनाअभावी अद्यापही पडून आहे. दुर्लक्ष व कालापव्ययामुळे हे साहित्य पूर्णत: निरुपयोगी होऊन ते नष्ट होण्याची शक्यता असल्याने त्यावर सत्वर योग्य ती कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखवावे.

निर्लेखन करावयाच्या साहित्याचा तपशिल खालीलप्रमाणे ..

| अ.क्र. | तपशिल | नग संख्या |
|---|---|---|
| १ | लाकडी बॉक्स | ४ |
| २ | लाकडी हॅन्ड डुप्लीकेटर | १ |

| | | |
|---|---|---|
| ३ | हॅन्ड डुप्लीकेटर | १ |
| ४ | टाईप राईटर (इंग्रजी) | १ |
| ५ | टाईप राईटर (मराठी) | २ |
| ६ | सायकल | १ |
| ७ | फोटो फेम लाकडी | १ |
| ८ | गॅसबत्ती | २ |
| ९ | कंदील | १ |
| १० | लाकडी टेबल | २ |
| ११ | लाकडी खुर्ची | ३० |
| १२ | मुव्हींग चेंबर | १ |
| १३ | स्टील फोल्डींग खुर्ची | २ |
| १४ | बेंच | १ |
| १५ | लाकडी ट्रे | २४ |
| १६ | टेबल फॅन | १ |
| १७ | सतरंजी | १ |

---

**परिच्छेद क्रमांक ३५ :- पंचायत समितीचे लेखे.**

पंचायत समितीकडील लेख्यांची स्थिती सर्वसाधारणतः बरी आहे.

---

**परिच्छेद क्रमांक ३६ :- आक्षेप विवरणपत्र.**

लेखापरीक्षणात आढळून आलेल्या किरकोळ स्वरुपाच्या आक्षेपांची पूर्तता लेखा परीक्षण कालावधीत करुन घेतल्याने स्वतंत्र आक्षेप विवरणपत्र निर्गमित करण्यात आलेले नाही.

---

**परिच्छेद क्रमांक ३७ :- वार्षिक लेखे.**

या लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपांचे संपूर्ण पूर्ततेस अधिन राहून व निवडक महिन्यांशिवाय इतर महिन्यांतील जमा खर्चामध्ये कुठलीही गंभीर अनियमितता अंतर्गत लेखापरीक्षणामध्ये आढळून आलेली नाही याआधारे पंचायत समितीचे सन २००६-२००७ चे लेखे बरोबर आढळून आले आहेत, असे नमुद करण्यात येत आहे.

---

**परिच्छेद क्रमांक ३८ :- अनुपालन व पोहोच.**

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम १०(१) प्रमाणे, प्रस्तुत लेखापरीक्षण अहवालांतील आक्षेपांचे अनुपालन, चार महिन्यांचे आत पंचायत समितीच्या ठरावाच्या प्रतिसह तीन प्रतीत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे स्वाक्षरीने पाठविण्यांत यावे, तसेच अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक कळवून पोहोच दयावी.

(वि. ए. कोते)
उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा,नाशिक.

**प्रत -सविनय सादर**

१) मा. सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई .
२) मा. महालेखापाल, बाहय लेखापरीक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३) मा. आयुक्त, नाशिक विभाग, नाशिकरोड.
४) मा. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
५) मा. उपमुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग, नाशिक .

**प्रत सस्नेह अग्रेषित :-**

१) म. उपमुख्य लेखा परीक्षक (पंचायत राज समिती), स्थानिक निधी लेखा, नवीमुंबई
२) म. गटविकास अधिकारी, पंचायत समिती निफाड, जिल्हा नाशिक.

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक